# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

द्वितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – मराठी

समय –3.00 घंटे　　　　वर्ग – **9 (B)**　　　　गुण – 80

---

**गदय विभाग**

**खालील उतारा वाचून त्यावर आधारीत कृति सोडवा.**

**कृती ?**


**माहिती लिहा** (2)

1) ऑलिंपिक ध्वजावरील वर्तुळाचे रंग.

1) ——— 2) ——— 3) ——— 4) ——— 5) काळा

2) ऑलिंपिक ध्वजावरील पाच वर्तुळे म्हणजे जगातील

1) ——— 2) ——— 3) ——— 4) ——— 5) युरोप हे पाच खंड



ऑलिंपिक गावाकडे आमची मोटार भरधाव वेगाने जात होती. गर्दी प्रचंड असली तरी रहदारीला अडचण मुळीच नव्हती. येण्याजाण्यासाठी वेगवेगळे रस्ते होते. खेळांचे मैदान जवळ येऊ लागले, तसे आमचे डोळे समोरील क्षितिजाकडे लागले. खूपच उंच अशा स्तंभावर एक भलामोठा ध्वज फडफडत असलेला आम्हांला दिसला. ऑलिंपिक सामन्यांचे ते स्वतंत्र निशाण होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळ्या, निळ्या, हिरव्या व काळ्या रंगांची वर्तुळे एकमेकांत गुंफलेली होती. जणू पाच मित्रच हातांत हात घालून आपल्या मैत्रीची साक्ष जगाला देत होते! ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ. या ध्वजावर ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य लिहिलेले आहे– 'सिटियस, ऑल्टियस, फॉर्टियस.' म्हणजे गतिमानता, उच्चता, तेजस्विता. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त गतिमान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अधिकाधिक उंची गाठण्याची शिकस्त केली पाहिजे आणि बलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त श्रम केले पाहिजेत, असा संदेश हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तिदायक मशाल सतत तेवत असते. ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडाशौकिनांसाठी एक पर्वणीच असते. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रांतील सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामन्यांमध्ये भाग घेतात. स्त्री-खेळाडूंचीही संख्या दोन हजारांच्या आसपास असते. प्रेक्षागारात सुमारे सत्तर ते ऐंशी हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते. याशिवाय सुमारे पंचवीस हजार लोकांना हे सामने उभे राहून पाहता येतात. पोहण्याच्या शर्यतीसाठी चार-पाच तलावही बांधलेले असतात.

**कृती 2 (2)**

**आकृती पूर्ण करा.**

ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य

[ ]

वाक्यातून मिळणारा संदेश

[ ]　[ ]　[ ]

**कृती 3　व्याकरण** (2)

| | मूळशब्द | शब्दजात | प्रकार | लिंग |
|---|---|---|---|---|
| 1) पुरूषांसाठी | ——— | ——— | ——— | ——— |
| 2) स्त्रियांसाठी | ——— | ——— | ——— | ——— |

**कृती 4** **स्वमत** (2)

ऑलिंपिकच्या खेळांचा तुमच्या मते असलेला फायदा समजावून सांगा.

**उतारा 2**

खालील उतारा वाचून त्यावर आधारित कृती सोडवा. (2)

**कृती 1**

आकाशवाणीवरील आभारप्रदर्शनाची कारणे

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

तो आभार मानत होता, कारण त्याला लहानपणापासून तसं शिकवलेलं होतं. आभार न मानण्याचा मॅनरलेसपणा त्याच्या खाती रुजू होणार नव्हता. सर्व नात्यांना, सर्व निमित्तांना लागू होतील अशी आभारकार्ड आताही मिळताहेत, पुढे ती आणखी वाढतील. जन्मल्या जन्मल्या आईबापांचे आभार मानणारं कार्ड आणि वर गेल्यावर खालून वेळच्या वेळी आपल्याला नीट वर पोचवणाऱ्यांचे आभार कार्ड अजून माझ्या पाहण्यात आलेलं नाही. लवकरच तसं आल्यास आश्चर्य वाटायला नको.

तसे आमचे जुने आकाशवाणीवालेही बऱ्यापैकी आभारबाज होतेच. विशेषतः आपल्या आवडत्या कार्यक्रमांमध्ये तर आभारांचा मारा होई. गाणं कळवलंत म्हणून आभार, हवं ते गाणं ऐकवलंत म्हणून आभार, पत्राची दखल घेतली म्हणून आभार, आभाराच्या पत्राला उत्तर म्हणून परत आभार, अशी चैन तेही करत. सध्याच्या चॅनलवाल्यांनी त्यांना चारीमुंड्या चीत केलेलं आढळतं. एकेकदा मनात येतं, की या सर्व चॅनेलवाल्यांनी एक मार्ग काढावा. रोज सकाळी प्रत्येक चॅनेलवरचे कार्यक्रम सुरू करताना आणि रोज रात्री पडदा मिटवताना एकदा सर्वांचे सर्व गोष्टींबद्दल घाऊक आभार मानून टाकावेत किंवा कोणताही कार्यक्रम गळत असला, तरी ठरावीक वेळानंतर एक आभाराची कॅप्शन.. तळटीप फिरवत राहावी. जसे-

- आजच्या दिवसभरात किंवा अमुकअमुक सत्रामध्ये ज्यांनी ज्यांनी आमच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेतला त्यांचे आभार. त्यांनी तोंड उघडल्याबद्दल आणि योग्य वेळी ते बंद केल्याबद्दल धन्यवाद.

**कृती 2** **माहिती लिहा.** **(2)**

1) अजूनही तयार न झालेली आभाराची कार्डे
   1) ————
   2) —————

2) का ते लिहा.
   1) अलिकडच्या लहान मुलाच्या खात्यावर 'मॅनरलेसपणा''रूजू होणार नाही.
   2) आभार मानणे दिवसेंदिवस कृत्रिम होत आहे.

**कृती 3** **(व्याकरण)** **(2)**

खाली दिलेल्या शब्दांसाठी मराठी भाषेतील शब्द लिहा.

1) कॅप्शन ——— 2) ऑपरेशन ————

3) आर्किटेक्ट ———— 4) ऑपरेशन ————

**कृती 4** **(स्वमत)**

शुभेच्छा कार्डे, आभारकर्डे, अभिनंदन कार्डे इत्यादी बद्दल तुमचे मत लिहा. (2)

**उतारा 3 (अपठित उतारा)**

**पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

**कृती 1** (2)

विधाने पूर्ण करा.

1) सर्व कामांची काळजीपूर्वक आखणी करणे आणि त्यानुसार कामे पार पाडणे, म्हणजे————

2) सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही, कारण ————

आपल्या कामाची आखणी करणे, किती वेळात काम संपेल त्याचे नियोजन करणे आणि ठरवल्याप्रमाणे काम पार पाडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'वक्तशीरपणा' होय. औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांमुळे आता तर जीवन खूप गतिमान व गुंतागुंतीचे बनले आहे. त्यामुळे सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही. वेळेत कामे पार पाडली नाहीत, तर आपण फक्त आपलेच नुकसान करतो असे नव्हे, तर आपल्याबरोबर आपण इतरांचेही नुकसान करतो. कल्पना करा की, बसच्या ड्रायव्हरने आळस करून एक तास उशिरा बस नेली, तर त्याच्या आळसामुळे केवळ त्याचा एक तास वाया जातो, असे नसून, त्याच्याबरोबर बसमधील पन्नास-साठ माणसांचा प्रत्येकी एक तास वाया जातो. त्या एका तासात करण्यासाठी म्हणून त्या माणसांची जी कामे ठरलेली असतात, ती एकतर रद्द होतात किंवा पुढे ढकलली जातात. या कामांवर अवलंबून असणाऱ्या इतर माणसांचेही मग नुकसान होते. म्हणून आपल्या कामांचे नियोजन करून ती वेळच्या वेळी पार पाडण्याचा कसोशीने प्रयत्न करायला हवा. हाच वक्तशीरपणा होय. वक्तशीरपणा न पाळणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणे होय.

**कृती 2** **(2)**

**1) आकृती पूर्ण करा.**

सध्याचे जीवन गतिमान होण्याची कारणे

↓ [ ] ↓ [ ]

2) कोणाचे ते लिहा.

वक्तशीरपणा पाळला नाही, तर नुकसान होते.

**कृती 3** **(व्याकरण)** **(2)**

उभयान्वयी अव्यय ओळखा आणि त्याचा प्रकार लिहा.

अव्यय – [ ] अव्ययाचा प्रकार – [ ]

**कृती 4** **(स्वमत)** **(2)**

तुमच्या मते वक्तशीरपणाचे असलेले फायदे लिहा.

## पदयविभाग

**अ) पुढील कवितेचे वाचन करून त्यावर आधारित कृती सोडवा.** (2)

बाळ रंणांगणावर जातो, म्हणून

आई या दुःख्द गोष्टी करणार नाही

↓ [ ] ↓ [ ]

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दुःखाचा;
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म जाणते वीराचा.

नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार.
मीच लावुनि ठेविली
तुझ्या तलवारीला धार.

अशुभाची साउलीहि
नाही पडणार येथे;
अरे मीहि सांगते ना
जिजा-लक्ष्मींशी नाते.

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ति देईल भवानी,
शिवरायाचे स्वरूप
आठवावे रणांगणी

धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!

**कृती 2 योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **(2)**

1) कवितेतील आई आपल्या मुलाला औक्षण करत आहे कारण ----
अ) मुलाचा वाढदिवस आहे.
आ) तो रणांगणावर जाणार आहे.
इ) त्याने रंणांगणावर शौर्य गाजवले आहे.
ई) त्याने क्रीडा स्पर्धेत नैपुण्य प्राप्त केले आहे.

2) स्वतंत्रता राखणारे बाळाचे विक्रमी -----
अ) पाय ब) डोळे क) हात ड) कान

**कृती 3**

1) 'धन्य करी माझी कूस, येई विजयी होऊन (4)
पुन्हा माझिया हाताने दूधभात भरवीन, या काव्यपंक्तीतील भावसौंदर्य स्पष्ट करा.
2) कवितेतील वीरमातेच्या भावना तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) पुढील कवितेवर दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती सोडवा.**

1) महाराष्ट्रवरूनी टाक ओवाळून काया

**किंवा**

वनवासी

**प्रश्न**

1) प्रस्तुत कवितेची कवी/कवयित्री (1)
2) कवितेचा रचनाप्रकार (1)
3) कवितेचा काव्यसंग्रह (1)
4) कवितेचा विषय (1)
5) कवितेची मध्यवर्ती कल्पना (2)
6) कवियेतील आवडलेल्या ओळी (2)

**इ) पुढील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत करा.** **(4)**

कर्तुत्वाचे घडवी वेरूळ, कर्तव्याला मुकू नको मातेसह मातीसह देणे फेडायला चुकू नको.

## विभाग 3 स्थूलवाचन

**प्र. 4 अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा** (6)

1) 'बिग 5' चे थोडक्यात वर्णन करा.

2) 'शब्दकोश सोडवल्यामुळे भाषिक कौशल्य वाढते' याविषयी तुमचे मत लिहा.

3) पाठाच्या आधारे सिंहाचे कुटुंब व लेखकाचे कुंटुंब यांच्या भेटीचा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग 4 भाषाभ्यास

**प्रश्न 4 अ) 1) खालील वाक्यप्रचारांचा योग्य अर्थ शोधा व लिहा.** **(1)**

नाळ तुटणे ---

1) मैत्री जमणे 2) संबंध न राहणे 3) संबंध जुळणे डोळे भरून येणे ---

1) खूप रडणे 2) दु:ख होणे 3) डोळयांत पाणी येणे

**2) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहून, अर्थ न बदलता वाक्य पुन्हा लिहा.** **(1)**

1) मुळगावकरांचे जीवन असमाधानी नव्हते.

2) रमेश अबोल प्रवृत्तीचा होता.

**3) खालील वाक्यांती अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्ये पुन्हा लिहा.** **(2)**

1) तिच्या गोड गळयाने कधीही दगा दिला नाही.

2) सवाई गंधर्व महोत्सव प्रसिद्ध गायकाच्या गायनाने रंगला.

**4) कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे वाक्यांचे रूपांतर करा.** **(2)**

1) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी. (आज्ञार्थी करा.)

2) आईने माझ्याकडे निराशेने पाहिले (नकारार्थी करा.)

**5) पुढील वाक्यांत योग्य विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा** **(2)**

1) बाबा चला जेवून घ्या मनू म्हणाला

2) आबा म्हणाले अरे अया रडते काय फरसू

**आ) खालील पैकी कोणत्याही एका वृत्ताचे उदाहरण देऊन स्पष्टीकरण करा.** **(2)**

1) दिंडी किंवा 2) आर्या

**2) पुढील ओळीतील अलंकार ओळखा व स्पष्ट करा.** **(2)**

चाफा बोलेना चाफा चालेना

**किंवा**

मखमलीहून मऊ तुझे गाल बाळ।

**3) पुढील शब्दांतील सामान्यरूपे ओळखा.** **(1)**

1) मातीची ----- 3) पूर्वजांनी ----

2) रक्ताचे ----- 4) कथेत ------

**4) गटात न बसणारा शब्द लिहा.** **(1)**

1) अंबर, सागर, धरती, वरती, भूमी

2) ध्वज, खुरपे, धैर्य, ज्योत, कंकण

**5) पुढील ओळीतील रस ओळखा.** (1)

1) नको सख्या नको मला हिऱ्यांचे रांजण
   बांधले पायात तुझ्या नावाचे पैंजण

2) 'गड आला पण सिंह गेला –––!

## विभाग 5 उपयोजित लेखन

**प्र. 5 अ) खालील कृती सोडविणे अपेक्षित आहे.**

**1) पत्रलेखन**

वाचा आणि प्रगल्भ व्हा

विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी!

**अक्षरमैत्र वाचनालय, जुनेशहर, अकोला**

यांच्यातर्फे

दुर्मीळ पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री

**स्थळ :** अक्षरमैत्र वाचनालय सभागृह, जुनेशहर, अकोला.

**दिनांक :** १५ ऑक्टोबर व १६ ऑक्टोबर

**वेळ :** सकाळी १० वा. पासून ते सायं. ५ वा. पर्यंत

***किंवा***

सुजय/सुजया – विद्यार्थी या नात्याने दुर्मीळ पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(२) सुजय/सुजया – शालेय प्रतिनिधी या नात्याने आयोजकांना शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

2) गदय विभाग अपठित उताऱ्याचे स्वतःच्या शब्दांत एक – तृतीयांश सारांश लिहा.

### कथालेखन

**पुढील अपूर्ण कथा वाचा. तुमचा विचार व कल्पनेने कथा पूर्ण करा.**

आंतरशालेय स्पर्धा –––धावण्याच्या स्पर्धेत शाळेचा सहभाग ––– अर्थव शाळेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ––––– स्पर्धेचा दिवस –––– उत्तम सरावा –––नंतर स्पर्धेत चुरस–प्रतिस्पर्धी
तनयही उत्कृष्ट खेळाडू ––– चुरस खरी अर्थव व तनयमध्ये ––– प्रत्यक्ष स्पर्धा सुरू ––– अचानक तनयचा पाय मुरगळणे ––– अर्थवचे स्पर्धा सोडून तनयच्या मदतीला धावणे –– अर्थव स्पर्धा हरूनही जिंकल्याचे समाधान ––– कौतुक

**प्र 5 आ) खालील पैकी कोणत्याही कृती सोडवा.** **(5)**

**1) जाहीरात लेखन**


**पुढे दिलेल्या शब्दांवरून आकर्षक जाहिरात करा.**

छत्री, रेनकोट, पाऊस,

2) बालमित्र चित्रकला स्पर्धेत तुमच्या शाळेतील चि. अमित/कु. अमिता घोलप यास /हीस राज्यपातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्याची/तिची मुलाखत घ्या.

**3) पुढील विषयावर संवाद लेखन करा.**

शून्य कचरा:




**प्र 5 इ) लेखन कौशल्य** **(5)**

1) वर्गातील बाक तुमच्याशी बोलतोय अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहा.

**किंवा**

2) मी पक्षी झाले, तर ––––––.

***